कांद्यावरील निर्यातमूल्य बंधन रद्द

४० टक्के निर्यात शुल्काविषयी मात्र स्पष्टता नाही

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : केंद्र सरकारने शनिवारी (१३ सप्टेंबर) कांद्याच्या निर्यातीवरील बंदी उठवली. आता कांदा निर्यातीवर प्रतिटन ५५० डॉलरचे किमान निर्यात मूल्याचे बंधन असणार नाही. निर्यातीवरील संपूर्ण बंदी उठवली असली, तरीही निर्यातीवरील ४० टक्के निर्यात शुल्क लागू असेल किंवा नाही, याबाबत पुरेशी स्पष्टता नाही.

केंद्र सरकारच्या परराष्ट्र व्यापार विभागाचे महासंचालक संतोष कुमार सारंगी यांनी याबाबतचे परिपत्रक प्रसिद्धीस दिले आहे. त्यात कांदा निर्यातीवर असलेले प्रतिटन ५५० डॉलरचे किमान निर्यात मूल्य हटविण्यात आल्याचे नमूद केले आहे. सरकारने तातडीने हा आदेश लागू केला आहे. पण, कांदा निर्यातीवर असलेल्या ४० टक्के निर्यात शुल्काबाबत काहीही उल्लेख नाही. त्यामुळे निर्यात शुल्काबाबत अद्याप संभ्रम आहे.

केंद्र सरकारने देशात कांद्याची पुरेशी उपलब्धता राहावी, यासाठी आठ डिसेंबर २०२३ मध्ये परिपत्रक काढून ३१ मार्च २०२४ पर्यंत कांद्याच्या निर्यातीवर बंदी घातली होती. विधानसभा निवडणुकीत कांदा उत्पादक पट्ट्यात मोठा फटका बसण्याची चिन्हे दिसू लागल्यानंतर कांद्यावरील निर्यातबंदी उठवली आहे. पण, अद्यापही ४० टक्के निर्यात शुल्काचा अडथळा कायम आहे. आता निर्यातमूल्याचे बंधन हटविण्यात आले असले, तरी निर्यात करताना हा ४० टक्के निर्यात कर किंवा निर्यात शुल्क लागू राहणार की कसे याबाबत संभ्रम आहे.

कापूस, सोयाबीन उत्पादकांना १६०० कोटींची मदत

मुंबई : गतवर्षाच्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना १६०० कोटी रुपयांची मदत देण्याचा निर्णय सरकारने घेतला असून या मदतीचे तातडीने वितरण करण्याचे आदेश कृषी आयुक्तांना शुक्रवारी देण्यात आले आहेत. महायुती सरकारने २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना दोन हेक्टरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट एक हजार रुपये तर दोन हेक्टरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रति हेक्टर रुपये पाच हजार (दोन हेक्टरच्या मर्यादेत) अर्थसाहाय्य देण्याचा निर्णय काही दिवसांपूर्वी घेतला होता.

बासमती उत्पादकांनाही दिलासा

केंद्र सरकारने बासमती तांदळावरील प्रतिटन ९५० डॉलरचे किमान निर्यात मूल्यही हटविले आहे. आता बासमती तांदळावर कोणतेही निर्बंध असणार नाहीत. वाणिज्य आणि उद्योगमंत्री पियुष गोयल यांनी या बाबतची घोषणा करताना म्हटले आहे की, बासमतीच्या निर्यातीला चालना मिळून बासमती उत्पादक शेतकऱ्यांना फायदा होईल. कृषी आणि प्रक्रियायुक्त अन्न उत्पादने निर्यात विकास प्राधिकरण (अपेडा) या निर्णयाची तातडीने अंमलबजावणी करणार आहे.

शिक्षणाधिकाऱ्यांचे निलंबन योग्य की अयोग्य?

बदलापूर अत्याचार प्रकरण; तीन आठवड्यांत निर्णय घेण्याचे न्यायालयाचे 'मॅट'ला आदेश

लोकसत्ता प्रतिनिधी

मुंबई : बदलापूर येथील दोन बालिका लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर निलंबित करण्यात आलेले ठाण्याचे शिक्षणाधिकारी बाळासाहेब राक्षे यांनी निलंबनाविरोधात केलेल्या अर्जावर तीन आठवड्यांत निर्णय घ्यावा, असे आदेश उच्च न्यायालयाने शुक्रवारी महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाला (मॅट) दिले.

त्याच वेळी, राक्षे यांच्या अर्जावर मॅटतर्फे निर्णय दिला जाईपर्यंत त्यांच्या जागी कोणत्याही अधिकाऱ्याची नियुक्ती करू नये, असे अंतरिम आदेश न्यायमूर्ती अनिल चांदूरकर आणि न्यायमूर्ती राजेश पाटील यांच्या खंडपीठाने राज्य सरकारला दिले. तत्पूर्वी, बदलापूर येथील घटनेनंतर शालेय शिक्षण मंत्र्यांनी तातडीची बैठक बोलावली होती. बदलापूर येथील संबंधित शाळेतील सीसीटीव्ही कॅमेरे कार्यान्वित नव्हते. त्यामुळे, धोरणानंतरही शाळांमध्ये मुलांच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात आले नसल्याचे बैठकीत उघड झाल्यावर शिक्षणमंत्र्यांनी त्याबाबत नाराजी व्यक्त केली होती. त्यानंतर, सर्व शाळांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्याची जबाबदारी असलेले मुंबईचे शिक्षणाधिकारी राजेश कंकाळ यांच्यासह राक्षे यांना निलंबित केल्याचे शिक्षणमंत्र्यांनी जाहीर केले.

अंबरनाथमध्ये वायूगळती

प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून कंपनीवर कारवाई

लोकसत्ता प्रतिनिधी

अंबरनाथ: अंबरनाथ शहराच्या मोरिवली औद्योगिक वसाहतीत निवाकेम कंपनीच्या हलगर्जीपणामुळे गुरुवारी रात्री रासायनिक वायूगळती झाल्याची माहिती प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकाऱ्यांनी दिली. कंपनीत रसायनांचे पींप उघडे राहिल्याने त्या रसायनाचा पाण्याशी संपर्क आल्याने वायूनिर्मिती झाली. तो वायू शहरभर पसरल्याने शेकडो नागरिकांना त्रास झाला. त्यावरून शहरात संताप व्यक्त होत होता. आता प्रदूषण नियंत्रण मंडळ या कंपनीवर बंदीची कारवाई करणार आहे. दरम्यान शहरात पाहणीसाठी आलेल्या मंडळाच्या अधिकाऱ्यांसोबत स्थानिक आमदार डॉ. बालाजी किणीकर यांचा शाब्दिक वाद झाला. डॉ. किणीकर यांनी मंडळाच्या अधिकाऱ्यांना फैलावर घेतले.

गेल्या काही वर्षात अंबरनाथ, बदलापूर, डोंबिवली या शहरांमध्ये नागरी क्षेत्र औद्योगिक क्षेत्राच्या अगदी जवळ गेले आहे. त्यामुळे एखादी घटना घडली की त्याचा मोठा फटका आसपासच्या भागातील रहिवाशांना बसतो. औद्योगीक क्षेत्रातील कंपन्यांकडून होत असलेल्या बेजबाबदारपणाची अनेक उदाहरणेही समोर आली आहेत. गुरुवारी असाच काहीसा प्रकार अंबरनाथ शहरात समोर आला. एकीकडे शहरात गणपती आणि गौरी विसर्जनाचा उत्साह असताना दुसरीकडे मोरीवली औद्योगिक वसाहतीतील निवाकेम या कंपनीत रासायनिक वायू गळती झाल्याची माहिती समोर आली. यामुळे मोरिवली, अंबरनाथ पूर्वेतील बी केबिन रस्ता परिसर आणि आसपासच्या भागात मोठ्या प्रमाणावर रासायनिक वायू पसरला.

शुक्रवारी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाच्या प्रादेशिक अधिकाऱ्यांनी मोरिवली आद्योगिक क्षेत्रातील निवाकेम कंपनीत पाहणी केली. या कंपनीत एचसीएल प्रकारातील रसायन उघड्यावर ठेवून ही कंपनी गुरूवारी सायंकाळी बंद करण्यात आली होती, अशी माहिती मंडळाचे प्रादेशिक अधिकारी राजेंद्र राजपूत यांनी दिली आहे. सायंकाळी कंपनीत फक्त सुरक्षा रक्षक होता. रसायन उघड्यावर ठेवल्याने पाण्याशी संपर्क येताच त्यातून वायू निर्मिती झाली.

संबंधिक कंपनीच्या हलगर्जीपणावरून कंपनी बंद करण्याच्या परवानगीचा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाला पाठवण्यात आल्याची माहिती राजपूत यांनी दिली आहे.

नागरिकांना श्वसनाचा त्रास

रात्रीच्या सुमारास हिवाळ्यात धुके पडावे तसा वायू पसरला होता. त्यामुळे दृश्यमानता कमी झाली. वायू रासायनिक असल्याने रस्त्यावर, घराबाहेर पडलेल्या नागरिकांना त्याचा त्रास जाणवू लागला. घसा खवखवणे, डोळे चुरचुरणे आणि श्वसनाचा त्रास होत असल्याचे स्थानिक रहिवाशांना जाणवले.

गृहनिर्माण संस्थांना मालकी हक्कासाठी समान शुल्क!

शासकीय भूखंडावरील सहकारी संस्थांना दिलासा

निशांत सरवणकर, लोकसत्ता

मुंबई : शासकीय भूखंडावरील सर्वच गृहनिर्माण संस्थांना मालकी हक्क (भोगवटादार दोनमधून धारणाधिकार एकमध्ये रुपांतर) बहाल करण्यासाठी आता यापुढे समान शुल्क आकारले जाणार आहे. याआधी वैयक्तिक वा संस्थेला वितरीत केलेल्या भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांना शीघ्रगणकाच्या (रेडीरेकनर) २५ टक्के शुल्क आकारले जात होते. ते आता शासकीय भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थेला लागू असलेल्या शीघ्रगणकाच्या दहा टक्के इतकेच शुल्क आकारले जाणार आहे. यामुळे अनेक सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिलासा मिळाला आहे.

राज्यात भाडेपट्टा (लीज) आणि कब्जेहक्काच्या (ऑक्युपन्सी) २२ हजार सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. मुंबईत भाडेपट्ट्याच्या १५०० ते १६०० तर राज्यात १८०० सहकारी गृहनिर्माण संस्था तर कब्जेहक्काच्या मुंबईत १४०० ते १५०० सहकारी गृहनिर्माण संस्था आहेत. या संस्थांना मालकी हक्क देण्यासाठी राज्य शासनाने अधिसूचना जारी करून वैयक्तिक भूखंडधारकांना शीघ्रगणकाच्या २५ टक्के तर सहकारी गृहनिर्माण संस्थांना शीघ्रगणकाच्या १५ टक्के रक्कम भरुन मालकी हक्क मिळणार होता.

त्यात बदल करून फक्त सहकारी गृहनिर्माण संस्थांना खासगी विकासकाने पुनर्विकास केल्यास दहा टक्के तर स्वयंपुनर्विकास केल्यास पाच टक्के रक्कम भरून मालकी हक्क दिला जाणार होता. परंतु वैयक्तिक वा संस्थेला दिलेला भूखंड सहकारी गृहनिर्माण संस्थेला अधिकृत वा अनधिकृतपणे हस्तांतरित झालेला असला तरी मालकी हक्क देण्यासाठी शीघ्रगणकाच्या २५ टक्केच रक्कम आकारली जात होती. याबाबत शहर जिल्हाधिकाऱ्यांनी शासनाकडे पत्र पाठवून विचारणा केली होती. याबाबत महसूल विभागाने स्पष्टीकरण दिले असून अशा भूखंडावरील सहकारी गृहनिर्माण संस्थांकडूनही शीघ्रगणकाच्या दहा टक्के रक्कम आकारण्यास अनुमती दिली आहे.

इन द डेब्ट रिकव्हरी ट्रिब्युनल, नागपूर,
दुसरा मजला, बी-ब्लॉक, सीजीओ कॉम्प्लेक्स, सेमिनरी हिल्स, नागपूर -४४०००६

O. A क्रमांक 224/2022 — **FF: 28/10/2024**

अर्जदार- बँक ऑफ इंडिया
विरुद्ध
प्रतिवादी - जुगल अग्रवाल

१) जुगल अग्रवाल, त्याच्या कर्ताद्वारे श्री. जुगल खेमचंद अग्रवाल,
दुकान क्रमांक १६,१७,१८,१९, तळमजला, विदर्भ साहित्य संकुल, झाशी राणी स्क्वेअर, नागपूर-४४००१२.

पेपर प्रकाशन समन्स

1. उपरोक्त नामांकित अर्जदाराने या न्यायाधिकरणात वरील संदर्भित OA दाखल केला आहे.
2. जेव्हा समन्सची सेवा सामान्य पद्धतीने प्रभावित होऊ शकत नाही आणि जेथे बदली सेवेसाठी अर्जदारास या न्यायाधिकरणाने परवानगी दिली आहे.
3. तुम्हाला या न्यायाधिकरणासमोर व्यक्तिशः किंवा वकिलामार्फत हजर राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत आणि लिखित निवेदन दाखल करा 28/10/2024 रोजी सकाळी 10:30 वाजता.
4. तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी आणि निर्णय घेतला जाईल याची नोंद घ्या.

नागपूर येथे जुलै 2024 च्या 19 व्या दिवशी माझ्या हाताखाली आणि न्यायाधिकरणाच्या शिक्का खाली दिले

SEAL

सही/- आर्यन कुमार
सहाय्यक पंजीयक
ऋण वसुली अधिकरण, नागपूर

चिपळूण नगर परिषद, चिपळूण
शुद्धिपत्रक (तिसरी मागणी)
ई-निविदा सूचना मागविणारी सूचना क्रमांक ७५, २०२४-२५
कार्यालयाचे नाव - चिपळूण नगर परिषद, ता. चिपळूण, जि. रत्नागिरी

चिपळूण नगर परिषदेकडील ई-निविदा सूचना क्रमांक ७५, सन २०२४-२५ अन्वये चिपळूण नगर परिषद पाणीपुरवठा विभागासाठी एक वर्ष मुदतीकरिता व्यवस्थापन सेवा पुरविण्याकामी ई-निविदा प्रणालीद्वारे ई-निविदा मागविण्यात आल्या आहेत. सदर निविदेस मुदतवाढ देण्यात येत आहे. सदर निविदेबाबतचा सविस्तर तपशील, अटी व शर्ती महाराष्ट्र शासनाचे www.mahaetenders.gov.in// या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. निविदा सादर करण्याची अंतिम तारीख दिनांक १८.०९.२०२४ रोजी सायंकाळी ५.०० वाजेपर्यंत राहील.

दिनांक : १२.०९.२०२४

सही/-
मुख्याधिकारी
चिपळूण नगर परिषद

दिनांक 23 /08/2024

नावात बदल करण्याबाबत घोषणापत्र

मी श्रीमती निशा महेश मोहुर्ले पत्नी दिवंगत महेश विठ्ठल मोहुर्ले, वय 38 वर्ष, सध्या राहणार आलापल्ली, तालुका आलापल्ली, जिल्हा-गडचिरोली, महाराष्ट्र राज्य येथे वास्तव्यास आहेत.

मी याद्वारे खालीलप्रमाणे शपथेवर नमूद करते की

1) माझे पती महेश विठ्ठल मोहुर्ले हे भारतीय सैन्यात इंजिनिअर या पदावर कार्यरत होते. त्यांचा आर्मी क्रमांक 15594713 L Eng.109 SPR असून त्यांचा दिनांक 02-08-2019 रोजी मृत्यू झाला आहे.
2) माझ्या मुलाचे खरे आणि मूळ नाव स्वर्ण महेश मोहुर्ले आहे आणि ते त्याच्या आधार कार्डवर, शाळेच्या रेकॉर्डवर आणि इतर सर्व कागदपत्रांवर नोंदवलेले आहे.
3) परंतु माझ्या पतीच्या सेवा रेकॉर्डवर माझ्या मुलाचे नाव स्वर्ण म्हणून नोंदवले गेले आहे, जे माझ्या मुलाच्या खऱ्या नावाशी जुळत नाही. माझा मुलगा असा एकमेव व्यक्ती आहे ज्याचे नाव स्वर्ण आणि स्वर्ण महेश मोहुर्ले आहे.
4) त्यामुळे पुढील रेकॉर्डसाठी माझ्या मुलाचे नाव स्वर्ण महेश मोहुर्ले असे मानले गेले पाहिजे, जे त्याच्या आधार कार्डावर आणि इतर सर्व दस्ताऐवजावर नोंदवलेले आहे.

त्यामुळे हे प्रतिज्ञापत्र सादर करीत आहे.

दिनांक 23 /08/2024
निशा महेश मोहुर्ले
प्रतीवादी, रा. आलापल्ली, जिल्हा गडचिरोली.

महाराष्ट्र ग्रामीण बँक — **ताबा सूचना** (नियम ८(१) अंतर्गत) (चल /अचल मालमत्तेसाठी)

मुख्य कार्यालय : प्लॉट नं. ४२, गट क्र. ३३ (भाग) गोलवाडी गाव, ग्रोथ सेंटर, वाळूज महानगर- IV, सिडको, छ संभाजीनगर - ४३१ १३६
क्षेत्रीय कार्यालय : रश्मीनगर, ऑडीटर सोसायटी जवळ, हर्सूल टी-पॉईंट, छ संभाजीनगर

ज्याअर्थी खालील सही करणार **प्राधिकृत अधिकारी/ क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, क्षेत्र** छ संभाजीनगर (**शाखा** : रांजणगाव शे., ता.गंगापुर, जि. छ.संभाजीनगर) यांनी सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल असेटस् ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सेक्युरीटी इंटरेस्ट कायदा,२००२ आणि सिक्युरीटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट रुल्स २००२) मधील नियम ८ सह वाचण्यात येणाऱ्या कलम १३ (१२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार कर्जदार/कंपनी/जामीनदार यांना मागणी नोटीस पाठवून त्यांनी नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांचे आत परतफेड करण्याचे कळविले होते. कर्जदार/कंपनी/जामीनदार हे मुदतीत परतफेड करण्यास असमर्थ ठरले आहेत,म्हणून कर्जदार/कंपनी/जामीनदार आणि तमाम जनतेस कळविण्यात येते कि,खालील सही करणार यांनी खालील परिशिष्टात नमूद केलेल्या चल/ अचल संपत्ती/ मिळकतीचा उपरोक्त कायद्याचे नियम ८ सह वाचण्यात येणाऱ्या कलम १३ (४) मधील अधिकारांचा वापर करून सांकेतिक ताबा घेतला आहे. विशेषतः कर्जदार/कंपनी/जामीनदार व तमाम जनतेस सावध करण्यात येते कि,खालील परिशिष्टात नमूद केलेल्या चल/ अचल संपत्ती/मिळकतीबाबत कोणीही,कसल्याही प्रकारचा व्यवहार करू नये. याउपर कोणीही सदरील चल/ अचल संपत्ती / मिळकतीबाबत व्यवहार केल्यास तो व्यवहार **प्राधिकृत अधिकारी/ क्षेत्रीय व्यवस्थापक, महाराष्ट्र ग्रामीण बँक, क्षेत्र** छ संभाजीनगर (**शाखा** : रांजणगाव शे., ता.गंगापुर, जि. छ.संभाजीनगर) यांचा खाली नमूद रक्कम अधिक पुढील व्याजाच्या बोझासहित असेल.

चल / अचल मालमत्तेचे विवरण

कर्जदार/ जामीनदाराचे नाव, कर्ज खाते क्रमांक	ताब्यात घेतलेल्या मालमत्तेचे विवरण	सुचनेप्रमाणे देय रक्कम	मागणी सूचना दिनांक	सांकेतिक ताबा दिनांक	शाखेचे नाव
कर्जदार : **१) कॅपजी इंडस्ट्रीज प्रायवेट लिमिटेड** कॅपजी इंडस्ट्रीज प्रायवेट लिमिटेड, गट नं.११३,मौजे करोडी, ता. जि .छ.संभाजीनगर **संचालक धनंजय नारायणराव तांदुळकर व सुजाता धनंजय तांदुळकर,** प्लॉट नं ११ सीटीएस नं.४६३/४,बिल्डर हौसिंग सोसायटी, अभिषेक रविकिरण अपार्टमेंट, फ्लॅट नं.७,नंदनवन कॉलनी,छ.संभाजीनगर **जामीनदार: १) सौ. शकुंतला नारायणराव तांदुळकर,** प्लॉट नं.२१,एम.हाऊस नं.६७५/अ,सिटी सर्वे नं.२७९,स्ट्रीट नं.७४, खसरा नं.१७९/४,५,फो नं.११,फारस स्क्वेर च्या जवळ आटा चक्की च्या मागे, मौजा जिंगाबाई टाकळी,नागपुर **२) सौ. शशिकला जोगेश्वर चौधरी** जोगेश्वर चौधरी यांची पत्नी, टाइप २ अ ८१४,एचएएल टाउनशीप ओझर टी.एस.ता.निफाड जि.नाशिक,४२२२०७ **३) सौ. विजया मनिष उपांकर** प्लॉट नं.२१,आदर्श नगर, फारस जिंगाबाई टाकळी,नागपुर,महाराष्ट्र ४४०००१ **कर्ज खाते क्र.:** ८००८११४४७९२	मालाचे व मशीनरी चे नजर गहाणखतवधनंजयनारायणराव तांदुळकर,शकुंतला नारायणराव तांदुळकर, शशिकला जोगेश्वर चौधरी, आणि विजया मनिष उपांकर यांच्या नावे असलेले मालमत्ता खासरा नं. १७९/४,५, मौजा जिंगाबाई टाकळी, पी एच नं.११, सिटि सर्वे नं.२७९,प्लॉट नं.२१, राहते घर नं. ६७५/ अ, ज्याचे एकुण मोजमाप क्षेत्रफळ १८५.७७ चौ. मी व बांधकाम क्षेत्रफळ १०४.९० चौ.मी. एनएमसी/ एनआयटी च्या हद्दीत ,नागपुर ता. जि. नागपुर चे गहाणखत **चतु:सीमा:पूर्व:**-प्लॉटक्र.२९ **पश्चिमः** ले आउट रोड, **उत्तर:** प्लॉटक्र.२२,**दक्षिण:**प्लॉटक्र.२०	दि. ३०.०५.२०२४ वरील रु. १,०२,५४,४५८/- आणि दिनांक ३१.०५.२०२४ पासुनचे प्रलंबीत व्याज व इतर खर्च	३१.०५.२०२४	०९.०९.२०२४	रांजणगाव शे. ,ता.गंगापुर जि. छ.संभाजी नगर

स्थळ : छ. संभाजीनगर
दिनांक : १४.०९.२०२४

टिप : स्वैर भाषांतर, तफावत असल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य.

प्राधिकृत अधिकारी / क्षेत्रीय व्यवस्थापक
महाराष्ट्र ग्रामीण बँक, क्षेत्रीय कार्यालय : छ. संभाजीनगर

SMFG IndiaCredit — Pragati Ki Nayi Pehchaan
एसएमएफजी इंडिया क्रेडीट कंपनी लिमिटेड
(पूर्वीची फुलरटन इंडिया क्रेडिट कंपनी लिमिटेड)

कॉर्पोरेट कार्यालयः दहावा मजला, ऑफिस क्र. 101, 102 आणि 103, 2 नॉर्थ ॲव्हेन्यू, मेकर मॅक्सिटी, बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पु.), मुंबई-400051.

मागणी सूचना

सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, 2002 (''अधिनियम'') आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेन्ट) रुल्स, 2002 (''नियम'') मधील तरतुदींर्गत

निम्नस्वाक्षरीकार हे एसएमएफजी इंडिया क्रेडीट कंपनी लिमिटेड(पूर्वीची फुलरटन इंडिया क्रेडिट कंपनी लिमिटेड) चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सदर अधिनियमांतर्गत आणि नियम 3 सह वाचण्यात येणारया सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(12) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(2) अंतर्गत मागणी सूचना पाठविली ज्यात पुढील कर्जदारांना संबंधित सूचनेत नमूद रकमेचा सदर सूचना प्राप्त होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करण्याचे आवाहन करण्यात आले होते. निम्नस्वाक्षरीकारांना असे मानण्यास पुरेसे कारण आहे की कर्जदार मागणी सूचना स्वीकारण्यास टाळाटाळ करीत आहेत आणि त्यामुळे नियमांनुसार चिकटवून आणि प्रकाशनाच्या माध्यमातून सूचना बजावण्यात येत आहे. मागणी सूचनेतील मजकूर खालीलप्रमाणे आहेः

कर्जदाराचे नाव	मागणी सूचना दिनांक आणि रक्कम
1. शतनिक इंडस्ट्रीज 2. महेश पंढरी थलाल 3. अर्चना महेश थलाल	06 सप्टेंबर 2024 04 सप्टेंबर, 2024 रोजी रु. 29,92,911.70/- (रुपये एकोणतीस लक्ष ब्याण्णव हजार नऊशे अकरा आणि सत्तर पैसे फक्त)

तारण अचल मालमत्तेचे वर्णनः

श्री महेश पंढरी थलाल यांचे मालकीची मालमत्ता

मालमत्तेचे वर्णन- आरसी बांधकाम असलेले व्यावसायिक दुकान / ऑफिस क्र. 146, क्षेत्रफळ सुमारे 300 चौ.फू. (सुपर बिल्ट-अप), ऑफिस क्र. 147, क्षेत्रफळ सुमारे 314 चौ.फू. (सुपर बिल्ट-अप), ऑफिस क्र. 148, क्षेत्रफळ सुमारे 314 चौ.फू. (सुपर बिल्ट-अप), एकूण सुपर बिल्ट-अप क्षेत्रफळ सुमारे 928 चौ.फू. (सुमारे 86.21 चौ.मी.), सोबत सर्व जोडण्या, वीज फिटिंग, तेथील वीज मीटर आणि इतर सर्व वहिवाट व बाकी हक्क आणि सदर बिल्डींगमधील सामायिक परिसर आणि सुविधांमधील गुणोत्तराच्या प्रमाणातील हिस्सा व हितसंबंध, पहिला मजला, हनी अर्चना कॉम्प्लेक्स, ब्लॉक बी-2, प्रन्यास प्लॉट क्र. 1-ए-ए, सोबत सुमारे 4167.22 चौ.मी. क्षेत्रफळ असलेल्या प्रन्यासच्या प्लॉट क्र. 1-ए-ए मधील 1.0354% अविभाजित हिस्सा व हितसंबंध, दहीपुरा व उंटखाना मधील नासुप्र चे मंजूर लेआउट, नासुप्र ची IA व IB स्कीम, तह. व जि. नागपूर. सीएस क्र. 143, शीट क्र. 294, राजाबाक्षा रोड, महापालिका वॉर्ड क्र. 11, मौजे नागपूर, तह. व जि. नागपूर. चतुःसीमाः पूर्वेस- ऑफिस क्र. 145, पश्चिमेस- ऑफिस क्र. 149, उत्तरेस- मोकळे आकाश, दक्षिणेस- पॅसेज. प्लॉट क्र. 1-ए-ए च्या चतुःसीमाः पूर्वेस- राजाबाक्षा मेडिकल कॉलेज मेन रेड, पश्चिमेस- प्लॉट क्र. 33, 35 व 272, उत्तरेस- 30 फूट रुंद रस्ता, दक्षिणेस- 30 फूट रुंद मागील रस्ता.

याद्वारे कर्जदारांना आवाहन करण्यात येते की त्यांनी मागणी सुचेनेचे पालन करीत तीमध्ये नमूद केलेल्या रकमेचा भरण्याच्या दिनांकापर्यंतच्या लागू व्याज, अतिरिक्त व्याज, बाउन्स शुल्क, शुल्के व अधिभार इ. सह सदर सूचना प्रकाशित होण्याच्या दिनांकापासून 60 दिवसांचे आत भरणा करावा. कर्जदारांनी लक्षात घ्यावे की एसएमएफजी इंडिया क्रेडिट हे सुरक्षित धनको असून कर्जदाराने घेतलेली कर्ज सुविधा ही कर्जदाराने तारण म्हणून ठेवलेल्या अचल मालमत्तेच्या अनामत मत्तेवर घेतलेले सुरक्षित कर्ज आहे.

कर्जदारांनी विहित कालावधीत आपल्या संपूर्ण दायित्वांची पूर्तता न केल्यास एसएमएफजीआयएचएफसीएल यांना सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत सर्व अधिकारांचा वापर करण्यास मोकळीक असेल ज्यात इतर बाबींशिवाय अनामत मत्तेचा ताबा घेऊन तिचे विक्री किंवा सदर अधिनियम व नियमांतर्गत उपलब्ध असलेल्या इतर कोणत्याही उपायाचा वापर करून हस्तांतरण करण्याचाही समावेश असेल. एसएमएफजी इंडिया क्रेडिट यांना विक्री किंवा हस्तांतराच्या हक्काची अंमलबजावणी करण्याअगोदर अनामत मत्तेवर टाच आणणे / किंवा ती सील करण्याचाही हक्क आहे. तारण मालमत्तेची विक्री केल्यानंतर येणारी रक्कम एसएमएफजी इंडिया क्रेडिट यांना घेणे असलेल्या थकबाकीची पूर्तता करण्यास पुरेशी नसल्यास उर्वरित थकबाकी रकमेची वसुली करण्यासाठी स्वतंत्र कायदेशीर कारवाई सुरु करण्याचाही अधिकार एसएमएफजी इंडिया क्रेडिट यांना असेल. हा उपाय एसएमएफजी इंडिया क्रेडिट यांना इतर कोणत्याही कायद्यांतर्गत उपलब्ध असलेल्या इतर सर्व उपायांच्या व्यतिरिक्त आणि स्वतंत्र आहे.

सदर अनामत मत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेच्या संदर्भात कर्जदाराचे लक्ष सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(8) कडे वेधण्यात येते आणि शिवाय सदर अधिनियमातील अनुच्छेद 13(13) कडेही वेधण्यात येते ज्यात एसएमएफजी इंडिया क्रेडिट यांच्या लेखी पूर्व-संमतीविना अनामत मत्तेच्या संदर्भात सामान्य वापर वगळता विक्री, भाडेपट्टी किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरण करण्यास मज्जाव करण्यात येत असून वरीलचे पालन न केल्यास तो सदर अधिनियमातील अनुच्छेद 29 अंतर्गत दंडपात्र अपराध आहे. मागणी सूचनेची प्रत निम्नस्वाक्षरीकारांकडे उपलब्ध असून कर्जदारांची इच्छा असल्यास ते ती कोणत्याही कामकाजाच्या दिवशी सामान्य कामकाजाच्या वेळेत प्राप्त करू शकतात.

स्थानः नागपूर/महाराष्ट्र — **स्वा/-**
दिनांकः 14.09.2024 — **प्राधिकृत अधिकारी,**
एसएमएफजी इंडिया क्रेडिट कंपनी लिमिटेड
(पूर्वीची फुलरटन इंडिया क्रेडिट कंपनी लिमिटेड)

लोकसत्ता क्लासिफाइडस् — सगळ्यांकरिता सर्वकाही

नोकरीविषयक

पाहिजेत

OTHERS

स्मार्ट महिलांना वर्क फ्रॉम होम जॉब. पीसी घरी छोटी ऑफिस टाइपरूम आवश्यक. फॉर्च्युनर, थार, इनोव्हा कार भाडेकरारावर तसेच निर्व्यसनी ड्रायव्हर, स्कूटी, बाईकस्वार मुलं-मुली पाहिजेत. संपर्क- * 8080863961/ 8828427684.
0070924008-1

विवाहविषयक

मॅरेज ब्युरो

सौ. कुळकर्णी विवाहसंस्था. इंजिनीअर्स, डॉक्टर्स, CA, MBA, बँकर्स, सरकारी नोकरी, NRI, उद्योजक, बिझनेसमेन, सर्व जातींच्या वधूवरांची भरपूर स्थळे. ।।पवित्रविवाह।। 8369692734/ 8450914835/ 9892625606.
0070856738-10

जमीन विकणे आहे

शिर्डी, संभाजीनगर, नासिक, शहापूर, इगतपुरी, पालघर, कर्जतजवळच फार्महाऊस, बंगलो प्लॉट, जमिनी खरेदी-विक्रीस संपर्क- 9373080511/ 7045532344.
0070923467-1

फार्महाऊस

सीनियर सिटिझनांसाठी मुंबई, पुणे, नाशिकजवळ उत्पन्नासह ॲग्रो टूरिझम बागायत शेतघर खरेदीसाठी 9373080511 तुमची स्वहक्काची जमीन शेतघर देखरेखसह उत्तम डेव्हलपमेंटसाठी- 9699505226.
0070924015-1

यात्रासहल

दोस्तीटूर नर्मदापरिक्रमा अनुभव सुसंवाद मेळावा १५ सप्टेंबर, दुपारी ३.०० वा. बेडेकर कॉलेज, सिडको बसस्टॉप जवळ, ठाणे (पश्चिम). प्रवेश विनामुल्यः 9594880123
0070915287-4

भविष्यविषयक

ॲस्ट्रॉलॉजी : गोल्ड मेडलिस्ट, जन्मकुंडली बनविणे, जुळविणे, जन्मकुंडलीवरून तसेच हस्तरेषा-चेहरा, फोटोवरून आपल्या प्रश्नांवर सविस्तर भविष्य तसेच वास्तुशास्त्राचे महत्त्व, वास्तुशांतीचे साधे-सोपे उपाय ५० पानांवर लिहून मिळतील. पाहिजे असल्यास हिंदी/ इंग्रजीमधून लिखाण मिळेल. (प्रश्नांची फी एकदाच सुरुवातीला स्वीकारतो.) नवग्रहांचे रत्ने, भाग्योदय यंत्रे, रुद्राक्ष इतर शुभवस्तू सुचवितो व अनुष्ठान करून दिले जातील. मुख्य कार्यालय श्री. सुधाकर सदानंद जोशी, कु. यशश्री सुधाकर जोशी. सोमवार ते शनिवार सकाळी १० ते संध्याकाळी ६ योगीनिवास बंगला, पहिला मजला, किसन क्रॉस रोड, नवीन पोलीस क्वाटर्सजवळ, मालाड (पश्चिम), मुंबई- ४०००६४. ९८२०५५३२७६/ ९८२०६१२५७८. (वरील पत्याशिवाय आमची कुठेही शाखा अथवा प्रतिनिधी नाहीत.)
0070912268-1

महत्त्वपूर्ण निवेदन

वृत्तपत्रामध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींचा मजकूर (ॲडव्हर्टाइजिंग कॉपी) स्वीकारण्यापूर्वी काळजी घेतली जात असली तरी त्याच्या आशयाची (कन्टेन्ट) पडताळणी करणे शक्य होत नाही. तरी, आपल्या वृत्तपत्रांमध्ये अथवा प्रकाशनांमध्ये प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींतील जाहिरातदार कंपन्या, सहयोगी संस्था अथवा व्यक्तींबरोबर व्यवहार केल्यामुळे कोणत्याही स्वरूपाचे नुकसान वा हानी झाल्यास त्यासाठी अथवा संबंधित जाहिरातीतील आशयासाठी द इंडियन एक्स्प्रेस (प्रा.) लिमिटेडला जबाबदार ठरविता येणार नाही. त्यामुळे वाचकांना आम्ही असा सल्ला देतो की, जाहिरातदारांना कोणतीही रक्कम प्रेषित करण्यापूर्वी अथवा त्यांच्याबरोबर कोणत्याही स्वरूपाचे संमतिपत्र कार्यसिद्ध करण्यापूर्वी अथवा एखाद्या जाहिरातीवर आधारित कोणतीही कृती करण्यापूर्वी त्यांनी आवश्यक ती चौकशी करण्याची खबरदारी घ्यावी.

जना स्मॉल फायनान्स बँक
(शेड्युल्ड कमर्शियल बँक)

नोंदणीकृत कार्यालयः दि फेअरवे, तळ व पहिला मजला, सर्व्हे क्र. 10/1, 11/2 व 12/2बी, डोमलूरच्या पलीकडे, कोरामंगला रिंग रोड, ईजीएल बिझनेस पार्कच्या शेजारी, चल्लाघट्टा, बंगलोर-560071.

शाखा कार्यालयः प्लॉट क्र. 20, तळ मजला, पडोळे हॉस्पिटलसमोर, रिंग रोड, दीनदयाल नगर, त्रिमूर्ती नगर, नागपूर-440022

ई-लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स, 2002 मधील नियम 8(6) व 9 सह वाचण्यात येणारया सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनॅन्शिअल ॲसेट्स अँड एनफोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट (सर्फेसी अधिनियम), 2002 अंतर्गतई-लिलावाद्वारे विक्रीसाठी जाहीर सूचना

निम्नस्वाक्षरीकार हे जना स्मॉल फायनान्स बँक लि. चे प्राधिकृत अधिकारी असून त्यांनी सर्फेसी अधिनियमातील अनुच्छेद 13(4) अंतर्गत बहाल करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करीत खालील मालमत्तेचा ताबा घेतलेला आहे. कर्जदार आणि सर्व लोकांना याद्वारे सूचित करण्यात येते की बँकेच्या थकबाकीच्या वसुलीसाठी खाली नमूद खात्यातील तारण मालमत्तेचा ऑनलाईन लिलाव (ई-लिलाव) खाली नमूद दिनांकास ''जशी आहे जेथे आहे'' आणि ''जशी आहे जे काही आहे'' तत्त्वावर करण्यात येईल.

अ. क्र.	कर्ज खाते क्रमांक	मूळ कर्जदार/सह-कर्जदार /जामीनदाराचे नाव	13-2 सूचनेचा दिनांक	ताबा दिनांक	या दिनांकास सद्य थकबाकी	मालमत्तेची पाहणी करण्याचा दिनांक व वेळ	आरक्षित किंमत रु.	बयाणा रक्कम (रु.)	ई-लिलावाचा दिनांक व वेळ	बोली सादर करण्याचा शेवटचा दिनांक, वेळ व स्थान
1	30339420000690	1) श्री राजेश नीळकंठ यादव, 2) श्रीमती कविता राजेश यादव	25.11.2023	05.02.2024	06.09.2024 रोजी रु.20,98,472.78 (रुपये वीस लक्ष अठ्याणणव हजार चारशे बाहत्तर आणि अठ्याहत्तर पैसे फक्त)	20.09.2024 रोजी स. 9.00 ते सायं. 5.30 वाजेपर्यंत	रु. 11,35,000/- (रुपये अकरा लक्ष पस्तीस हजार फक्त)	रु. 1,13,500/- (रुपये एक लक्ष तेरा हजार पाचशे फक्त)	03.10.2024 रोजी स.11:00 पासून दु. 2:00वाजेपर्यंत	02.10.2024 रोजी सायं. 05.00 वाजेपर्यंत जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड,प्लॉट क्र. 20, तळ मजला, पडोळे हॉस्पिटलसमोर, रिंग रोड, दीनदयाल नगर, त्रिमूर्ती नगर, नागपूर - 440022

मालमत्तेचे वर्णन/ परिशिष्टः-गावठाण मालमत्ता क्र. 6734, एकूण क्षेत्रफळ सुमारे 585 चौ.फू. (54.36 चौ.मी.), सोबत तेथील बांधकाम, बजरंग नगर, मौजा महादुला, नगर पंचायत महादुला च्या हद्दीत, तहसील कामठी आणि जिल्हा नागपूर. **चतुःसीमाः** पूर्वेस- रवी यांचे घर, पश्चिमेस-मंजू मेश्राम यांचे घर, उत्तरेस- मोकळी जमीन आणि दक्षिणेस- रस्ता.

सदर मालमत्तांची **''जशी आहे जेथे आहे''** आणि **''जशी आहे जे काही आहे''** तत्त्वावर विक्री करण्यात येणार आहे आणि ई-लिलाव हा **ऑनलाईन** घेण्यात येईल. वर नमूद मालमत्तेच्या संदर्भात सर्व भरणा जना स्मॉल फायनान्स बँक यांचे नावे करण्यात यावा. लिलाव हा बँकेचे मान्यताप्राप्त सेवा पुरवठादार मे. फोरक्लोजर यांचेद्वारे https://bankauctions.inआणि www.foreclosureindia.com वेब पोर्टलवर घेण्यात येईल. अधिक माहिती आणि तपशील, साहाय्य, प्रक्रिया आणि ई-लिलावाच्या ऑनलाईन प्रशिक्षणासाठी संभाव्य बोलीदारांनी मे. फोरक्लोजर यांचेशी संपर्क साधावा, श्री अरिजित कुमार दाससंपर्क क्रमांकः 8142000725, ई-मेल आयडी :info@bankauctions.in / arijit@bankauctions.in-लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्यासाठीच्या अटी व शर्तीचा अधिक तपशील आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही चौकशीसाठी कृपया जना स्मॉल फायनान्स बँक चे **अधिकारी श्री अजय नाईक (मोबा.क्र. 9960948687) आणि श्री महेंद्र ब्राम्हणे (मोबा.क्र. 9029290202)** यांचेशी संपर्क साधावा. प्राधिकृत अधिकारयांच्या माहितीनुसार सदर मालमत्तांवर कोणतेही बोजे नाहीत. परंतु, संभाव्य बोलीदारांनी आपली बोली सादर करण्याअगोदर विक्रीस काढलेल्या मालमत्तेवरील बोजे, मालकी हक्क इ. बाबत स्वतः स्वतंत्रपणे चौकशी करावी. अटी असलेल्या बोली स्वीकारण्यात येणार नाहीत. ही वर नमूद कर्जदार/जामीनदार/गहाणकारांसाठी तारण मालमत्तांची ई-लिलाव घेणार येत असल्याबाबतची सूचनादेखील आहे. याद्वारे कर्जदार/जामीनदार/गहाणकारांना सूचित करण्यात येते की त्यांनी लिलावाच्या दिनांकाअगोदर अद्ययावत व्याज आणि आनुषंगिक खर्चांसह वर नमूद केलेल्या रकमेचा भरणा करावा, अन्यथा मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि काही थकबाकी शिल्लक राहिल्यास ती व्याज व शुल्कांसह वसूल करण्यात येईल.

दिनांकः 14.09.2024 स्थानः नागपूर — स्वा/- प्राधिकृत अधिकारी जना स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड